पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ८४४ दिनांक - ०५/१२/२०२३**

कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## आर्थिक व्यवहारातुन झालेल्या खुनाची १० तासात केली उकल आरोपीस केले जेरबंद

दि.०४/१२/२०२३ रोजी कोंढवा पोलीस ठाणेच्या हद्दीतील पारशी मैदान येथे इसम नामे शहानवाज उर्फ बबलु मुनीर सय्यद, वय ५५ वर्षे, रा.ताहिर हाईट्स, भाग्योदयनगर, कोंढवा पुणे यांचा पोटात, गळयावर धारधार हत्याराने भोकसुन वार करुन अज्ञात इसमाने खुन करण्यात आला होता. खुन करणाऱ्या अज्ञात इसमाचा शोध घेवुन ताब्यात घेण्याबाबतच्या सुचना वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संतोष सोनवणे यांनी दिल्या होत्या.

अज्ञात इसमाचा शोध घेण्याकामी कोंढवा पोलीस ठाणेकडील दोन पथके रवाना करण्यात आली होती. सहा.पोलीस निरीक्षक,लेखाजी शिंदे व त्याचे तपास पथक अज्ञात आरोपी यांचा शोध घेत असताना पोलीस अंमलदार **विकास मरगळे व जयदेव भोसले** यांना त्याच्या गुप्त बातमीदारामार्फत मिळाली होती की,पिसोळी भागातील एका बंद बिल्डीगमध्ये एक इसम काल रात्री पासुन घाबरलेला अवस्थेत थांबुन असुन त्याने काही गुन्हा केला असल्याची शक्यता आहे. तेव्हा सदर ठिकाणी तपास पथकातील अंमलदारासह रवाना होवुन पिसोळी भागातील धमार्वत पेट्रोल पंपाच्या मागिल बाजुस असणाऱ्या बिल्डींगमध्ये एक इसम टेरेसवर लपुन थांबल्याचे दिसले. तेव्हा त्यास स्टाफच्या मदतीने ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव पत्ता **नुमन जावेद खान,वय २६ वर्षे,रा.किंग स्टन इलेसिया सोसायटी,ॲथॉनिनगर,पिसोळी,पुणे** असे असल्याचे सांगितले. तेव्हा सदर इसमास ताब्यात घेवुन पोलीस ठाणेस आणुन चौकशी केली असता त्याने त्याचे साथीदारासह आर्थिक देवाण घेवाणीच्या कारणावरुन खुनाचा कट करुन शहानवाज उर्फ बबलु मुनीर सैय्यद यास पारशी मैदान येथे सद्दाम शेख, साहिल शेख याच्यासह घेवुन जावुन त्यास दारु पाजुन त्यानंतर त्याचा सर्वांनी मिळुन चाकु सारख्या हत्याराचा वापर करुन पोटात, गळयावर धारधार हत्याराने भोकसुन वार करुन खुन केल्याची कबुली आहे.

खुन करण्याच्या कारणाबाबत त्याच्याकडे चौकशी केली असता,त्याने शहानवाज उर्फ बबलु मुनीर सैय्यद याचा बॅकेकडुन घेतलेल्या क्रेडिट कार्डचे आर्थिक देवाण घेवाणीवरुन त्याच्यात दोन-तीन दिवसापुर्वी वाद झाले होते. त्यावेळी शहानवाज उर्फ बबलु मुनीर सैय्यद याने आरोपी यांना शिवीगाळ केली होती. त्या कारणावरुन चिडुन दोन दिवसापासुन खुन करण्याचे नियोजन करुन काल दि.०३/१२/२०२३ रोजी पारशी मेदान येथे घेवुन जावुन खुन केल्याची कबुली दिली आहे. सदर आरोपी यास अटक करण्यात आली असुन,शहानवाज उर्फ बबलु मुनीर सैय्यद याच्या खुनाबाबत अधिक तपास पोलीस निरीक्षक,गुन्हे,श्री.संदिप भोसले हे करित आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्वे प्रादेशिक विभाग,श्री.रंजन शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त परि.०५,श्री.विक्रांत देखमुख, मा.सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग,श्री.शाहुराव साळवे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.संतोष सोनवणे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.संदिप भोसले व संजय मोगले यांचे मार्गदर्शन व सुचनाप्रमाणे सहा.पोलीस निरीक्षक,लेखाजी शिंदे, सहा.पोलीस निरीक्षक,दिनेश पाटील, पोलीस अंमलदार,अमोल हिरवे, जयदेव भोसले, विकास मरगळे, निलेश देसाई, सुहास मोरे, राहुल थोरात, अभिजीत रत्नपारखी, शशांक खाडे, आशिष गरुड, राहुल वंजारी, रोहित पाटील यांनी केली आहे.